दैनिक www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १४१ • RNI : MAHMAR/2023/87818 • सोमवार दि.२४ मार्च २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# केंद्र सरकारने कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क हटवले: १ एप्रिल २०२५ पासून अंमलबजावणी

## राज्यातील लाखो कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना केंद्र सरकारने मोठा दिलासा दिला आहे. कांदा निर्यातीवरील वीस टक्के निर्यात शुल्क १ एप्रिल २०२५ पासून रद्द करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला केंद्र सरकारने घेतला आहे. या निर्णयाची अधिसूचना देखील जारी करण्यात आली आहे. यामुळे राज्यातील लाखो कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.गेल्या काही दिवसांपासून कांद्याचे भाव सातत्याने घसरत असल्यामुळे शेतकऱ्यांमधून नाराजी व्यक्त होत होती. उन्हाळी कांदा बाजारात येणार असल्याने येत्या काळात आणखी भाव खाली जाण्याची भीती व्यक्त होत होती. मात्र आता केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवरील २० टक्के निर्यात शुल्क पूर्णपणे हटवले आहे. यामुळे कांदा निर्यातीचा मार्ग आता पूर्णपणे मोकळा झाला आहे. राज्यात कांदा पिकाची लागवड जास्त झाली आहे व पोषक हवामान असल्याने उत्पादन जास्त होणार आहे. त्यामुळे कांद्याच्या भावात शेतकऱ्यांची कोंडी होऊ नये म्हणून कांदा पिकावरील २० टक्के निर्यात शुल्क हटवले जावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात होती. केंद्र सरकारच्या या निर्णयाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवी, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केंद्र सरकारचे आभार मानले आहेत.



### कांदा उत्पादकांना आता चांगला भाव मिळू शकेल–शिंदे

कांदा निर्यातीवरील २०% शुल्क रद्द करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयामुळे महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केली आहे. कांद्याचे निर्यात शुल्क रद्द करण्याबाबत शासनाच्या वतीने वेळोवेळी पंतप्रधान त्याचप्रमाणे केंद्रीय सहकार मंत्र्यांना विनंती करण्यात आली होती. या निर्णयामुळे कांदा उत्पादकांना आता चांगला भाव मिळू शकेल असेही शिंदे यांनी म्हटले आहे.

### राज्यातील कांदा उत्पादकांना मोठा दिलासा–मुख्यमंत्री

केंद्र सरकारने कांद्यावरील २० टक्के निर्यात कर संपूर्णत:: मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. १ एप्रिल २०२५ पासून या निर्णयाची अंमलबजावणी होईल. लासलगाव आणि पिंपळगाव येथून मोठ्या प्रमाणात कांद्याची आवक होत आहे. या निर्णयामुळं महाराष्ट्रातील कांदा उत्पादकांना मोठा दिलासा मिळणार आहे. हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेत महाराष्ट्रातील कांदा उत्पादकांना मोठा दिलासा दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदीजी आणि केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शाह यांचा अत्यंत आभारी असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

### हा निर्णय शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा–अजित पवार

या निर्णयाचे स्वागत करताना उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, केंद्र सरकारचा हा निर्णय राज्यातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. कांदा निर्यातीवर आकारण्यात येणारा २० टक्के निर्यात शुल्क रद्द केल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य दर मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. हा प्रश्न सुटावा यासाठी केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्याशी थेट संवाद साधून त्यांना याबाबत लक्ष घालण्याची विनंती केली होती. राज्यातील शेतकऱ्यांच्या अडचणी आणि त्यावरील तातडीने उपाययोजना करण्याची गरज लक्षात घेऊन त्यांनी पुढाकार घेत हा निर्णय घेण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. राज्य शासन राज्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध असून, भविष्यातही शेतकरी हिताचे निर्णय घेतले जातील. असेही उपमुख्यमंत्री पवार यांनी नमूद केले आहे.

---

### छत्रपती संभाजीराजेंचे मुख्यमंत्री फडणवीसांना पत्र

## महाराणी ताराबाईंच्या समाधीच्या संशोधनासाठी इतिहास तज्ज्ञांची समिती नेमण्याची मागणी

**मुंबई (वृत्तसंस्था)**–महाराणी ताराबाई यांच्या समाधी स्थळाबाबत छत्रपती संभाजीराजे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे. महाराणी ताराबाई यांच्या स्मृतीस्थळाबद्दल अधिक व विस्तृत संशोधनासाठी इतिहास तज्ज्ञांची समिती नेमण्याची मागणी या पत्राद्वारे छत्रपती संभाजीराजे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.इतिहास अभ्यासकांनी महाराणी ताराबाई यांचे स्मृतीस्थळ हे सातारा येथे संगम माहुली येथे असल्याचे मांडले आहे. महाराष्ट्र शासनाने इतिहास तज्ज्ञांची समिती नेमून या स्मृतीस्थळाबद्दल अधिक व विस्तृत संशोधन करावे व तत्काळ या स्मृतीस्थळाचा जीर्णोद्धार करावा, अशी विनंती छत्रपती संभाजीराजे यांनी पत्रातून मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.



संभाजीराजे आपल्या लिहितात की, शिवपुत्र श्री छत्रपती संभाजी महाराज व श्री छत्रपती राजाराम महाराज यांच्यानंतर स्वराज्याची धुरा हाती घेऊन ज्यांनी सात वर्षे औरंगजेबाशी लढा दिला व श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापिलेल्या हिंदवी स्वराज्याचे रक्षण केले, त्या शिवस्नुषा, मुघलमर्दिनी छत्रपती ताराबाई महाराणी साहेब यांचे स्मृतिस्थळ सातारा येथे संगम माहुली या ठिकाणी असल्याचे इतिहास अभ्यासकांनी मांडले आहे.पतीच्या मृत्यूनंतर खचून न जाता, शस्त्र हाती धरून रणांगणात उतरून औरंगजेबासारख्या क्रूर व बलाढ्य बादशहाला या महाराष्ट्राच्या मातीतच ज्यांनी गाडले, त्या स्वराज्यरक्षिका ताराराणी साहेबांचे स्मृतिस्थळ हे महाराष्ट्रासाठी जाज्वल्य प्रेरणास्थान आहे, असे संभाजीराजेंनी म्हटले आहे.मात्र, सध्या हे स्मृतिस्थळ अत्यंत दयनीय व दुर्लक्षित स्थितीत आहे. महाराष्ट्र शासनाने इतिहास तज्ज्ञांची समिती नेमून या स्मृतीस्थळाबद्दल अधिक व विस्तृत संशोधन करावे व तत्काळ या स्मृतीस्थळाचा जीर्णोद्धार करावा, ही विनंती, असे संभाजीराजे छत्रपतींनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

## मेडिकल चालकावर कठोर कारवाई करा युवा सेनेची आरोग्य मंत्र्यांना मागणी

**वरोरा । प्रतिनिधी**

बालाजी मेडिकल स्टोअर्सच्या हलगर्जीपणामुळे ज्योती जगन वांढरे (रा. वनोजा) यांना चुकीचे औषध दिल्याने तीव्र एलर्जीचा झटका आला. १२ फेब्रुवारी रोजी त्या वरोरा येथील बालाजी मेडिकलमध्ये गेल्या होत्या. गळा दुखणे आणि खोकल्याची तक्रार असल्याने त्यांनी 'अवॉइड ड्रग्स' कार्ड दाखवून योग्य औषध देण्याची विनंती केली होती. मात्र, चुकीचे औषध दिल्याने त्यांना उलट्या, चक्कर आणि एलर्जीचा तीव्र त्रास होऊ लागला. प्रकृती अधिक बिघडल्याने त्यांना तातडीने चंद्रपूर येथे हलविण्यात आले.

या प्रकरणी वरोरा पोलीस ठाण्यात आणि अन्न व औषध प्रशासन, चंद्रपूर येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.या घटनेबाबत युवा सेनेच्या वतीने आलेख रमेश



रट्टे, कार्यकारिणी सदस्य हर्षद शिंदे, युवा सेना चंद्रपूर जिल्हा प्रमुख शैलेश केलझरकर, अमित गावंडे आणि भूषण जाधव यांनी २३ मार्च रोजी नागपूर दौऱ्यावर असलेल्या सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांना निवेदन दिले.आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेत दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिले. ते संबंधित विभागाला याप्रकरणी तत्काळ चौकशी करून कठोर पावले उचलण्याच्या सूचना देणार आहेत.युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित मेडिकल चालकावर कठोर कारवाई करण्याची तसेच मेडिकल व्यवसायामध्ये होणाऱ्या हलगर्जीपणावर नियंत्रण ठेवण्यासाठी कडक उपाययोजना करण्याची मागणी केली.या प्रकरणामुळे वरोरा आणि परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. औषधांच्या चुकीच्या वापरामुळे गंभीर परिणाम होऊ शकतात, याची जाणीव प्रशासनाने ठेवून मेडिकल स्टोअर्सवर कडक नियंत्रण आणण्याची गरज असल्याचे मत आलेख रट्टे यांनी व्यक्त केले.

---

### सरकारच्या आश्वासनामुळे महिलांनी मतदान केले

## त्यामुळे पुढच्या बजेटआधी लाडक्या बहिणींचे पैसे द्यावेत-रामदास आठवले

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**–महायुतीने विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनामुळे राज्यातील लाडक्या बहिणींना २१०० रुपये कधी मिळणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. परंतु, यंदाच्या अर्थसंकल्पात त्याबाबत कोणतीही घोषणा न झाल्याने लाडक्या बहिणींची निराशा झाली आहे. २१०० रुपये न देण्यावरून विरोधकांकडून सरकारवर निशाणा साधला जात आहे. अशात केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी या योजनेवर मोठे भाष्य केले आहे. लाडक्या बहिणींना २१०० रुपये देणे अवघड आहे. मात्र, पुढच्या बजेटआधी लाडक्या बहिणींचे पैसे द्यावेत, अशी मागणी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी केली आहे.रामदास आठवले आज छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसह औरंगजेबाची कबर आणि सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूवरही भाष्य केले.लाडकी बहीण योजनेवर बोलताना रामदास आठवले म्हणाले की, लाडक्या बहिणींना २१०० रुपये देणे अवघड जात आहे. सरकारने दिलेल्या आश्वासनामुळे महिलांनी मतदान केले आहे. पुढच्या बजेटआधी लाडक्या बहिणींचे पैसे द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली.



### जयंत पाटील यांची ताकद आता इस्लामपूरपुरती मर्यादित

## पुढील निवडणुकीत खोत त्यांच्या मतदार संघातून निवडून येतील–गोपीचंद पडळकर

**सांगली (वृत्तसंस्था)**–जयंत पाटील यांची ताकद आता इस्लामपूरपुरती मर्यादित राहिली आहे. मतदारसंघातील लोकांनी त्यांचे मताधिक्य काठावर आणून ठेवले आहे. त्यांच्या मतदारसंघातून पुढच्या वेळी सदाभाऊ खोत किंवा सागर खोत यांनी जरी निवडणूक लढवली तरी त्यांचा पराभव होऊ शकतो, असे भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी म्हटले आहे.

गोपीचंद पडळकर पुढे बोलताना म्हणाले की, जयंत पाटील आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची झालेली भेट म्हणजे काही विशेष नाही. जयंत पाटील हे काही लढावू माणूस नसून वडीलांच्या रिक्त जागेवर पुढे आले आहेत, त्यांचा आणि संघर्षांचा काही संबंध नाही.गोपीचंद पडळकर म्हणाले की, जयंत पाटील हे सत्तेशिवाय राहू शकत नाही. हे लोकांनाही कळून चूकले आहे. त्यांची सत्तेसाठी लाचार होण्याची तयारी झाले असून आता पूर्णपणे शरण आले आहेत. मी ४० हजार मतांनी निवडून आलो आहे, ते केवळ ११ हजार मतांनी निवडून आले आहेत. आता त्यांची मतदारसंघात ताकद राहिलेली नाही.गोपीचंद पडळकर म्हणाले की, जयंत पाटील हा माणूस किरकोळ माणूस आहे. हे आमच्या काही लोकांना लक्षात येत नाहीये. त्यांच्याविरोधात जर सक्षम उमेदवार दिला असता तर ते ५० हजार मतांनी पडले असते. जयंत पाटील म्हणजे कासेला मोठी पण दूध चोरणारी म्हैस असून आता त्यांच्या गटाला घर घर लागली आहे, कुठेही प्रभावी गट राहिलेला नाही. त्यांची इस्लामपूरपुरती ताकद मर्यादित राहिली आहे. तिथे सुद्धा लोकांनी त्यांना काठावर आणून ठेवलं. पुढीलवेळी सदाभाऊ खोत किंवा त्यांचा मुलगा सागर जरी लढले तरी जयंत पाटील यांचा पराभव होऊ शकतो.




गोपीचंद पडळकर म्हणाले की, देवेंद्र फडणवीस यांनी पूर्ण विचार करूनच लाडकी बहीण योजना आणली आहे. पुढे सुद्धा ही योजना सुरू राहील अशी भूमिका सरकारची आहे. महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती पाहूनच ही योजना अंमलात आणली आहे. विरोधी पक्ष सात हजार रुपये ९००० रुपये खटाखट देतो असं म्हणत होतं. मात्र, त्यांच्याकडे या योजनेबाबत नियोजन नाही.

---

## सिंहस्थ कुंभमेळासाठी यूपीप्रमाणे कायदा तयार करणार:मेळा प्राधिकरणाचीही होणार स्थापना–मुख्यमंत्री फडणवीस यांची माहिती

**नाशिक (वृत्तसंस्था)**–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज नाशिक दौऱ्यावर आहेत. आज सकाळी त्यांनी त्र्यंबकेश्वर येथील ज्योर्तिलिंगाचे दर्शन घेतले. तसेच त्र्यंबकेश्वरच्या विकास आराखड्याचा आढावा घेतला. यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधत होऊ घातलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याविषयी माहिती दिली. उत्तर प्रदेशने महाकुंभसाठी ज्याप्रमाणे कायदा तयार केला, तसा कायदा सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी करणार असल्याचे ते म्हणाले.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, नाशिकमधील कुशावर्त तीर्थ त्र्यंबकेश्वरची पाहणी केलेली आहे. त्र्यंबकेश्वरचा एक विकास आराखडा प्रशासनाने तयार केला आहे. त्याचे प्रेझेंटेशन मी घेतलेले आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिकचा विकास आपण करत आहोत. तसाच त्र्यंबकेश्वरचाही विकास झाला पाहिजे. त्र्यंबकेश्वरच्या विकासासाठी ११०० कोटी रुपयांचा आराखडा तयार केलेला आहे. त्याचे दोन टप्पे आम्ही करत आहोत.पहिला टप्पा सिंहस्थ कुंभमेळ्यापर्यंत आपल्याला पूर्ण करता येईल आणि दुसरा टप्पा जो आहे, ज्यामध्ये काही कामे होतील. यामध्ये दर्शनासाठी कॉरिडोर तयार करणे, पार्किंगची व्यवस्था, शौचालयांची व्यवस्था, यासह तेथील वेगवेगळ्या कुंडांचे रिस्टोरेशन, तेथील प्रमुख मंदिरांचे रिस्टोरेशन, एएसआयच्या मध्यस्तीने प्रत्यक्ष मंदिरात रिस्टोरेशनची जी आवश्यकता आहे ते आणि अनेक प्रकारच्या सोयी तयार करण्याचा प्रयत्न या आराखडाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पुढच्या तयारीला लागण्यासाठी प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. लवकरच आम्ही हा प्रस्ताव हाय पॉवर कमिटी आणि त्यानंतर मुख्यमंत्री कमिटीकडे नेऊ आणि त्याला मान्यता देऊ. नाशिकमधील जी काही कामे आहेत, त्यालाही आम्ही मान्यता दिलेली आहे. जवळपास ११ पूल बांधत आहोत. रस्त्याचे मोठे जाळे तयार करत आहोत. ज्या ठिकाणी साधूग्राम तयार होत आहे, ती सगळी जागा ताब्यात घेत आहोत. त्याचाही विकास आपण करत आहोत. घाटांमध्ये नवीन सोयीसुविधा करत आहोत आणि काही घाट देखील वाढवत आहोत. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, याठिकाणी एसटीपीचे जाळे तयार करून पाणी शुद्ध राहिजे पाहिजे, यादृष्टीने एक आराखडा तयार केला आहे. कुठल्याही सिंहस्थाच्या आधी त्याचे काम पूर्ण करायचे ठरवले आहे, असेही फडणवीस म्हणाले.



# गोंडपिपरी तालुक्यात अवकाळी पाऊसाहस गारपीट; मिर्ची,भाजीपाला पिकांना मोठा फटका

**कर्जमाफी कडे शेतकऱ्यांचे लागले लक्ष**

आ.सुधीर मुनगंटीवार यांनी सत्ताधारी पक्षात असून पोट तिडकिने शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी असा अशी मागणी अधिवेशनात केली त्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या असून ९० टक्के शेतकऱ्यांनी पीक कर्ज भरला नसून कर्जमाफी कडे लक्ष लागले आहे

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

गोंडपिपरी तालुक्यात वादळ वाऱ्यासह मुसळधार अवकाळी पाऊस व गारपीट झाली. त्याच्यामुळे शेतकऱ्यांच्या मिरची पिकाला व भाजीपाला पिकाचे मुख्य नुकसान झालेली पाहायला मिळत आहे. दि.२१ शुक्रवारी सायंकाळी पाच ते सहा वाजता दरम्यान अचानक वादळ वाऱ्यासह मुसळधार अवकाळी पावसाला सुरुवात झाली तब्बल एक तास मुसळधार पाऊस व गारपीट गोंडपिंपरी तालुक्यातील वढोली,बोरगावसह अनेक गावात पाऊस व गारपीट झाली.या गारपीटी चा फटका सर्वाधिक भाजीपाला विक्रेत्यांना बसला आहे मिरची पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांना बसला आहे. मिरच्यांचा सळा अनेकांच्या शेतात पाहायला मिळत आहे.



**तात्काळ नुकसानीचे पंचनामे करावे**

दि.( २१ )शुक्रवारी गोडपिंपरी तालुक्यात वढोली,बोरगावसह अनेक गावात मुसळधार अवकाळी पाऊस व गारपीट झाली.मक्का मिरची व भाजीपाला पिकांचे प्रचंड नुकसान झाले.शेतकरी हतबल असून शेतमालाला भाव न्हवता अशावेळी शेतकऱ्यांच्या पाठीशी प्रशासनाने ,सरकारने राहून नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून त्यांना आर्थिक मदत मिळवून द्यावी.

–सुरज माडूरवार
तालुका प्रमुख शिवसेना गोंडपिपरी

# भद्रावतीत अवैध रेती तस्करीवर महसूल विभागाची कारवाई, तीन ट्रॅक्टर जप्त

**भद्रावती । प्रतिनिधी**

महसूल विभागाच्या गौण खनिज पथकाने अवैध रेती तस्करी करणाऱ्या तीन ट्रॅक्टरवर कारवाई करत सदर वाहने तहसील कार्यालयात जमा केली. ही कारवाई २२ मार्च रोजी पहाटे तीन वाजताच्या सुमारास चिरादेवी–कोची रोडवर करण्यात आली. गोपनीय माहितीच्या आधारे महसूल विभागाच्या पथकाने सापळा रचून ही कारवाई केली. तिन्ही ट्रॅक्टर बिननंबरची असून, त्यांचा वापर अवैध रेती वाहतुकीसाठी केला जात असल्याचे आढळले.तहसीलदार राजेश भांडारकर यांच्या नेतृत्वात मंडळ अधिकारी समीर वाटेकर, तलाठी वाघमारे , शिपाई निर्दोष फुलबोगे आणि गौण



खनिज पथकाने संयुक्तपणे ही कारवाई केली. जप्त करण्यात आलेले ट्रॅक्टर अण्णा खुटेमाटे, देविदास खुटेमाटे आणि मोहन दर्वे (रा. पिपरी) यांच्या मालकीचे असल्याचे सांगण्यात आले.पुढील कारवाई भद्रावती महसूल विभाग करत आहे.

# हिंगणघाट येथे मातोश्री आशाताई कुणावार महिला महाविद्यालयात जल दिनानिमित कार्यक्रमाचे आयोजन

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

मातोश्री आशाताई कुणावर कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय हिंगणघाट येथे 'जागतिक जल दिन' निमित्त अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले, कार्यक्रमाचे अध्यक्षा म्हणून डॉ.सपना जयस्वाल, प्रमुख अतिथी व मार्गदर्शिका प्राध्यापक आचल वैद्य ,रासेयो च्या सहकार्यक्रमाधिकारी
प्रा. भाग्यश्री साबळे, रासेयो च्या सहकारी प्रा. प्रतिभा दुबे, प्रा. हर्षदा




राऊत यांची उपस्थिती होती.
कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली,पाण्याविना नाही प्राण पाण्याचे तू महत्त्व जाण या ओळीतून प्रास्ताविकाची सुरुवात प्रा. भाग्यश्री साबळे यांनी केली, कार्यक्रमाच्या मार्गदर्शिका प्रा. आचल वैद्य यांनी जलदिनाचे महत्व सांगत जल हे जीवन असून त्याचा उपयोग आपण कसा करायचा यासंबंधी सविस्तर माहिती विद्यार्थिनींना दिली, अध्यक्षीय भाषणातून उपप्राचार्या डॉ. सपना जयस्वाल मॅडम यांनी पाणी वाचवा जीवन वाचवा असे सांगत विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो ची सी आर कु.प्रिया उरकुडकर आभार कु. हर्षदा मोरे या विद्यार्थिनींने मानले.कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील संपूर्ण प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनींची उपस्थिती होती.

# चैत्र नवरात्र यात्रेच्या पार्श्वभूमीवर महाकाली मंदिरात स्वच्छता मोहीम

## आ.किशोर जोरगेवार यांच्या पुढाकाराने उपक्रम, तयारीचा आढावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चैत्र नवरात्रोत्सवाच्या तयारीच्या अनुषंगाने महाकाली मंदिर परिसरात व्यापक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकाराने झालेल्या या मोहिमेत चंद्रपूर महानगरपालिका, भारतीय जनता पक्ष, श्री महाकाली माता महोत्सव समिती, महाकाली मंदिर ट्रस्ट आणि भक्तगणांनी सक्रिय सहभाग घेतला.
यावेळी महानगरपालिका आयुक्त विपिन पालिवाल, अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, उपायुक्त मंगेश खवले, सहायक आयुक्त शुभांगी सूर्यवंशी, स्वच्छता अधिकारी डॉ. अमोल शेडके तसेच श्री महाकाली माता ट्रस्टचे श्याम धोपटे, अजय जयस्वाल, सुनील महाकाले, मिलिंद गंपावार, भाजप नेते विजय राऊत, तुषार सोम, प्रकाश देवतडे, दशरथसिंह ठाकूर, मनोज पाल, प्रमोद शास्त्रकार, संजय बुरघाटे, वंदना हातगावकर



आदी मान्यवर उपस्थित होते.चैत्र नवरात्रोत्सवात महाकाली मंदिरात भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने परिसर स्वच्छ व सुशोभित ठेवण्यावर भर देण्यात आला. यासाठी मंदिर परिसरातील रस्ते, सभामंडप आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ करण्यात आली. कचरा संकलन, निर्जंतुकीकरण आणि पर्यावरणपूरक उपाययोजनांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले.
या मोहिमेनंतर आमदार किशोर जोरगेवार यांनी यात्रेच्या तयारीचा आढावा घेतला. महाकाली मंदिर परिसरातील स्वच्छता, भाविकांसाठी सुविधा, गर्दी नियंत्रण आणि आवश्यक उपाययोजनांबाबत चर्चा झाली. मंदिर परिसर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.महाकाली यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी आमदार जोरगेवार सातत्याने पाठपुरावा करत असून, यात्रेच्या कालावधीत उत्तम सुविधा निर्माण करण्यासाठी प्रशासनाने योग्य तयारी करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

# गेट परीक्षेत ऋषिकेश संदीपराव काळे याचे सुयश; देशात १७६वा क्रमांक

**पुलगाव । प्रतिनिधी**

पुलगाव येथील ऋषिकेश संदीपराव काळे या तरुणाने गेट (GATE) परीक्षेत उत्तुंग यश मिळवत पुलगावचे नाव उज्ज्वल केले आहे. होमी भाभा विज्ञान संस्थेत कनिष्ठ वैज्ञानिक म्हणून यशस्वी सेवा पूर्ण केल्यानंतर त्यांनी गेट परीक्षेत अखिल भारतीय स्तरावर (AIR) १७६ वा क्रमांक मिळवला आहे.
या यशानंतर ऋषिकेशचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. त्याने आपल्या यशाचे श्रेय आई–वडील, भाऊ आणि मित्रपरिवाराला दिले आहे. त्याच्या घरी मित्रांनी भेट देऊन त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.या वेळी अनुज हनुमंते, प्रणय जाधव, संकेत उईके, करण पटेल, अमन दरणे, अखिलेशसिंग धंदोरिया, ओम वानखेडे, प्रतीक जैस्वाल, संदीपराव काळे, सौ. शोभाताई काळे, राजेंद्र दरणे आदींनी ऋषिकेशचे अभिनंदन केले.



# सोशल मीडियाच्या गैरवापरप्रकरणी कारवाई ४ गुन्हे दाखल, २१ जणांवर प्रतिबंधक कारवाई

**परभणी । प्रतिनिधी**

सोशल मीडियावर वादग्रस्त पोस्ट व कमेंट केल्याप्रकरणी परभणी पोलिसांनी कारवाई केली आहे. या प्रकरणात ४ गुन्हे दाखल करण्यात आले असून, २१ जणांवर प्रतिबंधक कारवाई व ५७ जणांना नोटीस बजावण्यात आली आहे, अशी माहिती पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी दिली.सोशल मीडियाचा गैरवापर टाळण्यासाठी परभणी जिल्ह्यात सायबर पोलीस ठाण्यासह सर्व पोलीस ठाण्यांमध्ये 'सोशल मीडिया मॉनिटरिंग सेल' कार्यरत करण्यात आला आहे.वादग्रस्त पोस्ट, कमेंट टाळाव्यात आणि कोणतीही आक्षेपार्ह माहिती आढळल्यास ७७४५८५२२२२ या पोलीस नियंत्रण कक्षाच्या व्हॉट्सअ‍ॅप क्रमांकावर पाठवावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी केले आहे.

# विकासकामांच्या पाहणीसाठी जिल्हाधिकारी 'ऑनफिल्ड'

## सावली तालुक्यातील विविध गावांना भेटी; प्रकल्प व योजनांची पाहणी



**विकासकामांना गती देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून सूचना**

**जिल्हाधिकारी गौडा यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून अधिकाधिक लाभार्थ्यांना जोडण्याचे निर्देश दिले. रोजगार हमी योजनांतर्गत नवीन पायाभूत सुविधा निर्माण करण्यास प्राधान्य देण्याचेही त्यांनी स्पष्ट केले.**

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या १०० दिवस कृती आराखड्यांतर्गत जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांना आठवड्यात किमान दोन दिवस क्षेत्रीय भेटी देऊन केंद्र व राज्य शासनाच्या प्रकल्पांची पाहणी करण्याच्या सूचना आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी सावली तालुक्यातील विविध गावांना भेटी देऊन विकासकामांचा आढावा घेतला.जिल्हाधिकारी गौडा यांनी चकपिरंजी येथील गांडूळ खत युनिट, साई श्रेया शेतकरी उत्पादन कंपनी आणि नाविन्यपूर्ण प्रकल्पांना भेट दिली. वन्यप्राण्यांच्या त्रासामुळे शेतीचे नुकसान होत असल्याने झटका मशीन यंत्र उपलब्ध करून देण्यास पुढील वर्षीच्या नियोजनात विशेष प्राधान्य दिले जाईल, असे त्यांनी सांगितले. मौजा हिरापूर येथे रोजगार हमी योजनेतून ड्रॅगन फळ लागवडीचा प्रायोगिक प्रकल्प राबवण्याच्या सूचना तालुका कृषी अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. व्याहाड खुर्द ते गांगलवाडी या ४५ कि.मी. राज्य महामार्गाच्या बांधकामाची पाहणी करताना जिल्हाधिकाऱ्यांनी गुणवत्तापूर्ण रस्ते बांधणीच्या सूचना दिल्या.मातोश्री ग्रामसमृद्धी शेत पांदन रस्त्यांच्या पाहणीवेळी नवीन पांदन रस्त्यांची गुणवत्ता टिकवून अधिक शेतकऱ्यांना सहभागी करून घेण्याचे निर्देश दिले.या दौऱ्यात उपविभागीय अधिकारी अजय चरडे, तहसीलदार प्रांजली चिरडे, गटविकास अधिकारी योगेश गाडे, तालुका कृषी अधिकारी श्री. राऊत, आत्मा प्रकल्प संचालक प्रिती हिरुळकर, नायब तहसीलदार चांदेकर, मडावी, कांबळे तसेच प्रगतिशील शेतकरी अनिल स्वामी आणि अशोक चन्नुरवार, सरपंच श्री. तुम्मे, रोजगार सेवक, मंडळ अधिकारी, तलाठी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# जग जिंकण्याची ताकद प्रभावी अभिनयात असते–ॲड.सुनील चौधरी

**देवळी । प्रतिनिधी**

साहित्य आणि कला क्षेत्रातील दृश्य–श्राव्य माध्यमे समाजमनावर प्रभावी ठसा उमटवतात. या क्षेत्रात सिनेसृष्टी महत्त्वाची असली तरी अनेक कलाकारांचा प्रवास लहान पडद्यावरील टेलीफिल्म्समधूनच सुरू होतो. या माध्यमातून समाजावर प्रभाव टाकणारे सुप्रसिद्ध लघुपट अभिनेता जाकीर हुसेन कुरेशी यांचा येथील शासकीय विश्रामगृहात गौरव करण्यात आला.या वेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. सुनील चौधरी म्हणाले, जग जिंकण्याची ताकद प्रभावी अभिनयात



असते. समाजाला सुसंस्कारीत करण्याचे व सजग करण्याचे कार्य जाकीर कुरेशी यांच्यासारखे कलाकार करत असतात. किशोरवयातच त्यांनी दूरदर्शन आणि इतर मालिकांमधून आपल्या अभिनयाचा ठसा उमठवत स्वतःची ओळख निर्माण केली आहे.पुणे–हैदराबाद प्रवासादरम्यान जाकीर हुसेन कुरेशी यांनी वर्धा येथील बापूकुटीला भेट दिली. त्या निमित्ताने विविध संस्थांच्या वतीने शासकीय विश्रामगृहात त्यांचा सन्मान करण्यात आला. या गौरव सोहळ्यास विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमास ज्येष्ठ साहित्यिक इमरान राही, ॲड. असद खान पटेल, डॉ. प्रदीप कश्यप, विलास कुलकर्णी, सिंहान उल्हास वाघ, शशांक चतारे, एस. आर. शेख, एहसान राही, ॲड. जाहीद अली, अब्दुल गनी, ॲड. प्रियदर्शी वाघमारे, सईद शेख, राजेश धोपटे, ॲड. इब्राहीम बख्श, उल्हास पवार, धनंजय खेडकर, नामदेव अखाडे, कु. फिजा खान यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# वाळू अभावी घरकुल बांधकाम ठप्प; लाभार्थ्यांमध्ये नाराजी

**वर्धा । राहुल मून**

ग्रामीण तसेच शहरी भागात घरकुल योजनेअंतर्गत मंजूर झालेली घरे वाळू टंचाईमुळे अर्धवट स्थितीतच अडकली आहेत. शासनाकडून मंजूर झालेला निधी वेळेत वापरला गेला नाही, तर तो परत जाण्याची शक्यता असताना अनेक लाभार्थ्यांनी आपली जुनी घरे पाडून घरकुल योजनेच्या नव्या घराच्या बांधकामाला सुरुवात केली. मात्र, वाळूच्या टंचाईमुळे अनेकांचे बांधकाम सुरूवातीलाच ठप्प झाले आहे, तर काहींचे बांधकाम अर्ध्यावरच थांबले आहे.
शासनाने प्रत्येक घरकुल लाभार्थ्याला ५ ब्रास वाळू उपलब्ध करून देण्याचे



आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्षात अद्याप एकही वाळूचा कण लाभार्थ्यांपर्यंत पोहोचलेला नाही. परिणामी, या योजनेच्या लाभार्थ्यांना प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागत आहे.सदर परिस्थितीमुळे घरकुल बांधकामात प्रचंड खोळंबा निर्माण झाला असून, उघड्यावर राहण्याची वेळ अनेक कुटुंबांवर आली आहे. काही ठिकाणी अर्धवट बांधकामामुळे घरांची भिंत आणि पाया उघडे पडले असून, त्यामुळे पावसाळा किंवा अन्य नैसर्गिक आपत्तीमुळे आणखी नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे.लाभार्थ्यांनी प्रशासनाकडे वेळोवेळी तक्रारी करत वाळू उपलब्ध करून देण्याची मागणी केली असली तरी अद्याप त्यावर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये नाराजी पसरली असून, शासनाने तातडीने या समस्येवर तोडगा काढावा आणि वाळू उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## महापालिकेतील बेफिकीरीकडे खा.लंके यांनी वेधले लक्ष

# आयुक्तांशी पत्रव्यवहार जन्म, मृत्यू प्रमाणपत्र विभागातील कर्मचाऱ्यांचा बेफिकीरपणा

**अहिल्यानगर | सुयश नरसाळे**

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या जन्म व मृत्यू प्रमाणपत्र कर्यालयातील नागरिकांना होणारा प्रचंड त्रास हा अत्यंत गंभीर आणि असहाय्य झाला असून या कार्यालयातील दिरंगाई, बेफिकीरपणा आणि कर्मचाऱ्यांच्या उध्दट वर्तनात त्वरीत सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात यावेत अशा मागणीचे पत्र खा नीलेश लंके यांनी महापालिकेच्या आयुक्तांना दिले आहे.

या पत्रामध्ये खा. लंके यांनी नमुद केले आहे की, नगर शहरात मोठया प्रमाणावर जन्म, मृत्यूची नोंद होत असल्याने शहरासोबतच ग्रामीण भाग आणि इतर तालुक्यांतूनही हजारो नागरीक प्रमाणपत्रासाठी या कार्यालयात येत असतात. मात्र त्यांना वेळेवर सेवा मिळत नाही. कर्मचाऱ्यांकडून उध्दट वर्तन केले जाते. नागरिकांना अनेकदा फेऱ्या माराव्या लागतात. या कार्यालयातील ही परिस्थिती अतिशय गंभीर असून प्रशासनाने तातडीने सुधारणा करणे आवष्यक असल्याचे खा. लंके यांनी या पत्रात नमुद केले आहे. जन्म व मृत्यू प्रमाणपत्र तातडीने देण्यात यावे. अर्जदारांना ठरावीक कालमर्यादेत प्रमाणपत्र मिळेल याची हमी घेण्यात यावी. अनावष्यक दिरंगाई केल्यास सबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. कर्मचाऱ्यांचे वर्तन सुधारावे. कर्मचारी जनतेशी नम्रपणे आणि सहानुभूतीने वागतील याची जबाबदारी आयुक्तांची आहे. कोणत्याही कर्मचाऱ्याने उध्दट वर्तन केल्यास त्याच्यावर निलंबासह कठोर कारवाई करण्यात यावी असे खा. लंके यांनी या पत्रात म्हटले आहे.

कार्यालयात होणारी गर्दी आणि नागरिकांचा वेळ वाया जाणे हे टाळण्यासाठी अतिरिक्त खिडक्या सुरू करा, कर्मचारी संख्या वाढवा.नागरिकांना सतत महापालिकेत चकरा मारू लागू नयेत यासाठी ऑनलाईन अर्ज व प्रमाणपत्र वितरण व्यवस्था अधिक प्रभावी करा. नागरिकांच्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी तक्रार कक्ष सुरू करून ठरावीक कालावधीत तक्रारींची जबाबदारी निश्चित करा अशी सुचना खा. लंके यांनी केली आहे. आरोग्य अधिकाऱ्यांशी संपर्क करण्यात आला असता ते जबाबदारी घेण्याऐवजी टाळतांना दिसून येतात. माहीती सुविधा केंद्र दुपारी चार वाजता बंद करतात. त्याची वेळ चार ऐवजी सायंकाळी पाच अशी करण्यात यावी. जेणेकरून नागरीकांना मागे जावे लागणार नाही अशी सुचनाही खा. लंके यांनी केली आहे. महापालिकेच्या कार्यशैलीत तात्काळ सुधारणा न झाल्यास अधिकाऱ्यांवर प्रशासकीय पातवळीवर कारवाई करण्याची शिफारस करण्यास मला भाग पाडले जाईल. नागरिकांची सेवा तुमची जबाबदारी आहे आणि ती वेळेवर व तत्परतेने पार पाडली गेली पाहिजे.




# ले-आऊट मधील रस्ते व ओपन स्पेस मोकळे करा

## साईनगर वासियांचे पत्र परिषदेतून नगर परिषदेला आवाहन

**भद्रावती | प्रतिनिधी**

शहरातील विजासन रोडवरील साईनगर ले-आऊट मधील काही रस्ते व दोन ओपन स्पेस वैयक्तिक वापरामुळे बंद पडलेले आहे. या संदर्भात ले-आऊट मधील नागरिकांनी नगरपरिषद, तहसील कार्यालय तथा जिल्हाधिकारी कार्यालयात अनेकदा निवेदने व स्मरणपत्रे दिलेली आहे. याविषयी नगर विकास मंत्रालयाला सुद्धा निवेदन देण्यात आले आहे. मात्र याकडे संबंधित विभागांकडून सतत दुर्लक्ष करून याची दखल घेण्यात न आल्यामुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. संबंधित विभागांनी याची त्वरित दखल घेऊन ले-आऊट मधील रस्ते व ओपन स्पेस नागरिकांसाठी त्वरित मोकळे करून द्यावे अशी मागणी करून याची दखल न घेतल्यास याविरोधात लोकशाही पद्धतीने आंदोलन करावे लागेल असा इशारा साईनगर येथील नागरिकांनी घेतलेल्या एका पत्र परिषदेतून देण्यात आला आहे.



भूमापन क्रमांक ६३ व ६८ मध्ये साईनगर वसलेले आहे. या ले-आऊट मधील काही रस्ते व ओपन स्पेस अवैध बांधकामामुळे बंद पडले असल्याचा आरोप पत्र परिषदेतून करण्यात आला आहे. याबाबत वारंवार नगरपरिषद कार्यालयाकडे निवेदने सादर करून याचा पाठपुरावा करण्यात आल्याचे पत्र परिषदेतून सांगण्यात आले. बंद पडलेले रस्ते व ओपन स्पेस खुले करून देण्यासाठी येथील नागरिकांनी नगरपरिषदकडे सतत पाठपुरावा केला. मात्र नगर परिषदेकडून याकडे सातत्याने दुर्लक्ष केल्या जात असल्याचा आरोपही पत्र परिषदेतून करण्यात आला आहे. या विषयाची आवश्यक कागदपत्रे सुद्धा नगर परिषदेला सादर करण्यात आल्याचे सांगण्यात आले. याविषयी नगरपरिषद तर्फे येथील नागरिकांना ही समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र प्रत्यक्षात सदर कार्यालयाकडून कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे सांगण्यात आले. नगरपरिषदेने याकडे लक्ष देऊन ले-आऊट मधील बंद पडलेले रस्ते व ओपन स्पेस त्वरीत मोकळे करून द्यावे अशी मागणी पत्रपरिषदेतून येथील नागरीकांनी केली आहे. पत्रपरीषदेला अशोक हजारे, डॉ गजानन खामनकर, किशोर पांढरे, सुनंदा हजारे,प्राची खामनकर, ए.एम.देशमुख, प्रकाश खासरे, सुहास कोल्हे, हरीहर येलकर, राजकुमार हातझाडे, मुकेश रोकडे, गणपत ऊमाटे,वर्षा कोल्हे, भुमीका रोकडे, भारती पांढरे, वनीता ऊमाटे, वैशाली खासरे, निता बुरडकर, विद्या हातझाडे, वैशाली देशमुख, पुजा येलकर, वैशाली झाडे आदी नागरिक उपस्थित होते.

## चार एकर गहू जळून खाक

# शेतकऱ्याला मोठा आर्थिक फटका

**सालोड | प्रतिनिधी**

सालोड गावातील शेतकरी प्रितेश वसंतराव कुचेवार यांच्या शेतातील गहू काढणीसाठी तयार असतानाच अचानक लागलेल्या आगीत चार एकरवरील गहू जळून खाक झाले. ही घटना २२ मार्च २०२५ रोजी दुपारी तीनच्या सुमारास घडली.शेतात धूर निघत असल्याचे अमोल वंजारी यांच्या लक्षात आले. त्यांनी तात्काळ गावचे सरपंच अमोल कन्नाके, कुणाल टिपले, विकास खोडके, बालू ठाकरे यांना माहिती दिली. सर्वांनी शेताकडे धाव घेतली व आग विझवण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यांच्या पाठोपाठ गावातील इतर युवकांनीही माती, झाडांच्या फांद्या आणि पाण्याच्या सहाय्याने आग विझवण्याचे प्रयत्न केले.




आग इतकी भीषण होती की ती थेट शेतातील गोठ्यापर्यंत पोहोचली. गावकऱ्यांच्या सतर्कतेमुळे जनावरे, कोंबडी-बकऱ्यांचे प्राण वाचवण्यात यश आले. दरम्यान, सरपंचांनी अग्निशामक दलाला पाचारण केले. काही वेळातच अग्निशामक दलाने घटनास्थळी दाखल होऊन आग आटोक्यात आणली.या आगीत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी अंदाजे ५० पोत्यांइतक्या गव्हाचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे. शेतकरी प्रितेश कुचेवार यांना या आगीत मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले आहे.

# अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद, पुणेच्या नव्या कार्यकारिणीची निवड पूर्ण

**सोलापूर | प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद, पुणेची ११७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. या सभेत २०२५ ते २०३० या पंचवार्षिक कालावधीसाठी नवी कार्यकारिणी निवडण्यात आली.






संस्थेच्या अध्यक्षपदी शरदचंद्र पवार, तर उपाध्यक्षपदी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि संजय बाबुराव शेटे यांची निवड झाली. सामान्य सचिव (जनरल सेक्रेटरी) म्हणून प्रमिला भागवतराव गायकवाड, तर सहसचिव (जॉईंट सेक्रेटरी) म्हणून अजय उत्तमराव पाटील आणि वासंती विजयकुमार बोर्डे यांची निवड करण्यात आली. खजिनदारपदी भगवानराव बाबुराव साळुंखे आणि धैर्यशील वसंतराव वंडेकर* यांची नियुक्ती झाली. प्रमिला गायकवाड या निलज गावच्या रहिवासी असून, त्या *सेवानिवृत्त जिल्हा व सत्र न्यायाधीश भागवतराव दशरथ गायकवाड यांच्या पत्नी आहेत.

# स्वर्णक्रांती महिला संघटनेच्या वतीने जागतिक महिला दिन व रंगपंचमी उत्सव साजरा

**पुलगाव | प्रतिनिधी**

स्वर्णक्रांती महिला संघटनेच्या वतीने पुलगाव येथे सामाजिक व आध्यात्मिक वातावरणात जागतिक महिला दिन आणि रंगपंचमीचा उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित अतिथींचा सन्मान करण्यात आला. वर्षा जोशी यांनी स्वागतगीत सादर करून वातावरण भारावून टाकले, तर अमृता राळेकर यांनी गणेश वंदना सादर केली.



संघटनेच्या संस्थापिका आणि अध्यक्षा रिता येटीवार यांनी प्रास्ताविकात सांगितले की, महिलांचे सक्षमीकरण, जागृतीकरण आणि सामाजिक, आर्थिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक विकास व्हावा या उद्देशाने संघटनेची स्थापना करण्यात आली आहे.कार्यक्रमात सुवर्णा मुटटेवार यांनी मैत्रीवर गीत सादर केले, लता मोहोळे यांनी भावगीत सादर केले, तर सोनू खडतकर यांनी कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. फिटनेस क्लबच्या सपना श्रीरामे यांनी महिलांना आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. सेवानिवृत्त मुख्याध्यापिका ऊषा नाल्हे यांनी महिला दिनानिमित्त आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी कारगिल युद्धातील शहीद सोहनजी पवार यांची पत्नी गायत्री पवार यांचा विशेष सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व महिलांनी एकत्र येत रंगपंचमीचे औचित्य साधत गुलाल उधळून आनंदोत्सव साजरा केला.या कार्यक्रमाला सुरेखा जोरिगवार, मनिषा ठाकूर, गीता फटींग, सुनिता निचत, कल्पना येडांगे, प्रमिला हाटेकर, सत्यभामा बोरकर व इतर महिलांची उपस्थिती होती.

## साक्री तालुक्यात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट;आरोग्य प्रशासन कधी जागे होणार?

**धुळे | प्रतिनिधी**

साक्री तालुक्यात बोगस डॉक्टरांचे जाळे वाढले असून, वैद्यकीय पदवी नसतानाही अनेकांनी मोठी क्लिनिके सुरू करून रुग्णांच्या जीवाशी खेळ करण्याचा धंदा सुरू केला आहे. या मुन्नाभाईंनी लाखो रुपयांची कमाई करत ग्रामीण भागातील निष्पाप नागरिकांची फसवणूक सुरू केली असताना तालुका आरोग्य प्रशासन मात्र झोपेचे सोंग घेत आहे.



ग्रामीण भागात अनेक वर्षांपासून बोगस डॉक्टरांकडून नागरिकांच्या आरोग्याशी खेळ केला जात आहे. मात्र, यावर आरोग्य विभागाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केली नसल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अशा बोगस डॉक्टरांशी तालुका आरोग्य अधिकाऱ्यांचे 'अर्थपूर्ण' संबंध आहेत का? अशा चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाल्या आहेत.

साक्री तालुक्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांच्याच नाकाखाली हा अवैध व्यवसाय सुरू असताना, आरोग्य प्रशासनाने कारवाईचे धाडस का दाखवले नाही? असा प्रश्न उपस्थित होत आहे. या प्रकाराकडे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची तातडीची गरज आहे.

बोगस डॉक्टरांविरोधात कडक कारवाई न झाल्यास यामुळे रुग्णांचे मोठे नुकसान होऊ शकते. त्यामुळे तालुका आरोग्य प्रशासनाने तातडीने जागे होऊन बोगस डॉक्टरांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते करत आहेत.

# पंतप्रधान रोजगार निर्मिती जनजागृती मेळावा संपन्न

**बीड | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ व जन शिक्षण संस्थान बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जन शिक्षण संस्थानच्या प्रशिक्षार्थी व पीएम विश्वकर्मा योजनेच्या लाभार्थींसाठी उद्योजकता विकास, भारत सरकार व महाराष्ट्र सरकारच्या विविध वित्तीय योजनांच्या संदर्भात माहिती देण्यासाठी पंतप्रधान रोजगार निर्मिती जनजागृती मेळाव्याचे आयोजन दीनदयाल शोध संस्थान येथे करण्यात आले.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संभाजीनगरच्या उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर होत्या. पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना, मुद्रा लोन इत्यादींविषयी आवश्यक कागदपत्रे, सबसिडी व इतर तांत्रिक माहिती जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी डी. व्ही. फताटे यांनी दिली.जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक किरण जाधव यांनी उपस्थितांना उद्योजकतेविषयी मार्गदर्शन केले, तर महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे विभागीय व्यवस्थापक शिवशंकर लायलवार यांनी बँकेद्वारे दिल्या जाणाऱ्या कर्ज योजनांची माहिती दिली. जन शिक्षण संस्थानचे संचालक गंगाधर देशमुख यांनी कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकारच्या विविध प्रशिक्षण योजनांची माहिती दिली.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना अंजली धानोरकर यांनी विविध उदाहरणे देत महिला व पुरुषांनी स्वतःचे उद्योग व्यवसाय कसे वाढवावेत आणि त्यासाठी कोणत्या प्रकारे मेहनत घ्यावी, याविषयी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे औचित्य साधून पीएम विश्वकर्मा योजनेतील प्रशिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सीमा मनुरकर यांनी केले, तर आभार सुदाम पालकर यांनी व्यक्त केले. या मेळाव्यास जिल्ह्यातून २१५ हून अधिक लाभार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खादी ग्रामोद्योग मंडळ आणि जन शिक्षण संस्थानच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.यावेळी नाभिक महामंडळातर्फे जन शिक्षण संस्थानच्या सेविका सुनीता वाघमारे यांना 'आदर्श माता' म्हणून सन्मानित करण्यात आले.

# विद्यार्थ्यांना मोफत गणवेशासोबत बूट आणि पायमोजे; ५९ कोटींचा निधी मंजूर

**सातारा | प्रतिनिधी**

राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्था शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेशासोबतच बूट आणि पायमोजे देण्याचा निर्णय घेतला असून, त्यासाठी ५९.४८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

हा निधी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेस उपलब्ध करून देण्यात आला असून, त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. केंद्र सरकारच्या समग्र शिक्षण अभियानांतर्गत शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या मुली, अनुसूचित जाती-जमातीतील विद्यार्थी आणि दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचा लाभ मिळतो.

राज्य शासनाने प्रत्येक विद्यार्थ्यास दोन गणवेशांसाठी ६०० रुपये निश्चित केले आहेत. त्यासोबतच एक जोडी बूट आणि दोन जोड्या पायमोजे उपलब्ध करून देण्यासाठी प्रती विद्यार्थी १७० रुपये देण्याचे निर्देश दिले आहेत. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी यापूर्वी ८५ लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला होता.



मात्र, शिक्षण परिषदेला एकूण १४४.४८ कोटी रुपये निधी आवश्यक असल्याचे कळवण्यात आले होते. त्यानुसार यावर्षी ५९.४८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांना गणवेशासोबतच बूट आणि पायमोजे मिळणार आहेत.

या संदर्भात जिल्हा परिषद, सातारा प्राथमिक शिक्षणाधिकारी शबनम मुजावर यांनी सांगितले की, गेल्या वर्षीपासून मोफत गणवेशासोबत बूट आणि पायमोजे देण्याची अंमलबजावणी सुरू आहे. आता नवा निधी मंजूर झाल्याने पुढील शैक्षणिक वर्षातही विद्यार्थ्यांना हा लाभ मिळणार आहे.

राज्य शासनाच्या या निर्णयामुळे शालेय विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा मिळून त्यांचा शिक्षणातील सहभाग वाढण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# हलकेच बरसा सरींनो!



**मनुष्याला आयुष्यभर कष्ट करता करता विश्रांती घ्यायला वेळच मिळत नाही. जीवनाच्या या अविरत प्रवासाअंती उमगते की, जीवन हे मिथ्या आणि मृत्यू हेच सत्य आहे. हे सत्य स्वीकारायला अवघड असले तरी ते स्वीकारावेच लागते. मनाचा गलबला शांत करीत जगायला शिकावेच लागते. कारण, मनुष्याच्या श्वासाअंती उरतात फक्त त्याच्या आठवणी....! मग या आठवणींची पुंजी जीवनमूल्य रूपाने जपण्याचा प्रयत्न आपण करतो तेच खरे. खरेच....गंगाधरराव गेले हे सत्य आता स्विकारलं पाहिजे. फाल्गुन मासात जीवन मूल्यांचे रंग उधळीत ते अनंताच्या प्रवासाला चालते झाले.**

**हलकेच बरसा सरींनो
चिंब चिंब भिजलो आहे
हळुवार या स्वप्नांनो
आताच शांत निजलो आहे.**

चांगले लोक आणि चांगले विचार याचाच ध्यास गंगाधररावांना आयुष्यभर होता. कारण हे दोन शुद्ध बिजं सोबत असतील तर त्याचे अंकुर सशक्त, रसाळ आणि गोमटी राहणारच यावर त्यांची श्रद्धा होती. म्हणून प्रारंभिक काळात परिस्थितीशी संघर्ष करून त्यांनी वाणिज्य शाखेतील स्नातकोत्तर पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. वाढत्या वयाबरोबर या अंजनी पुत्राने आपली समज वाढविली. दौलतरावांच्या रूपाने आलेली धन-दौलत घरात होतीच. पण ती सांभाळून ठेवणे हेही त्यापेक्षा जास्त मोलाचे होते. आणि ती त्यांनी निष्ठेने अंतिम श्वासापर्यंत सांभाळली. यामागे त्यांचे सात्विकतेचे अधिष्ठान होते. पुढे मनोरमेच्या आगमनाने जीवनात वसंत फुलला आणि संसार वेलीवर चार फुलेही उमलली. आता जबाबदारी अधिकच वाढली होती. एका बाजूला दौलतरावांनी सोपवलेली विपुल शेती आणि दुसरीकडे मुलांचे शिक्षण याचा बॅलन्स गंगाधररावांनी अचूक साधला. आजही चिंचोली ला गेलो की त्यांच्या पाटीलकीचा बाज लक्षात येतो. तो प्रशस्त वाडा, धान्याने भरलेले कोठार, शेती उपयोगी संसाधने, रेंगी, छकडा आणि खासर आदी सर्व त्यांच्या शेतीनिष्ठतेची पाऊलचिन्हे आहेत. हे सर्व असले तरी मात्र त्या भरल्या वाड्यात गंगाधरराव यानंतर नसतील हेही तितकेच खरे. मृदू आवाजात गडी माणसांना त्यांच्या स्वभावासकट सांभाळणारी ही वात्सल्य मूर्ती आता शांत निजलेली आहे.......!

अशीच सर्व फुले खुडावी श्रश्रीराम चरणी अर्पण व्हावी

काही सार्थकता घडावी श्र या नश्वर देहाची

या ओळी प्रमाणे तो देह आता परलोकी लीन झाला आहे. आज त्यांच्या सार्थकतेची आठवण उसवताना मनाचा काठ गहिवरतो.मुलगा -मुलगी, घरचे -बाहेरचे, आणि ओठातले - पोटातले अश्या भेदांना त्यांनी आयुष्यभर लांब ठेवले. सर्वांवर समान प्रेम ते करायचे. त्यापेक्षाही व्यक्तीचा सन्मान ते करायचे. आणि त्यामुळेच माणसांचा मोठा गोतावळा त्यांच्या भोवताल असायचा.

**स्व.गंगाधरराव दौलतराव हिवंज विनम्र अभिवादन**

कालबाह्य रूढी, चालीरीती आणि परंपरा या बाबी त्यांच्या जीवनात कधीच झाकाळल्या नाहीत. हे सर्व करीत असताना समाजाचे काही देणे लागते या भावनेतून त्यांनी संत पैकाजी समाजाचेही कार्य नेटाने केले. समाजकार्यासाठी निधी गोळा करण्यापासून तर विविध कार्यक्रमांच्या आयोजनामध्ये त्यांचा हिरीरीने सहभाग असे. बऱ्याचदा चर्चा करताना आपण समाजाकरता काहीतरी केले पाहिजे ही तळमळ त्यांच्या बोलण्यातून जाणवत होती. राष्ट्रसंतांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता. याचे चिरंतन चिंतन त्यांच्या व्यवहारात दृष्टिक्षेपात येत होते.

गावागावांसी जागवा श्र भेदभाव हा समूळ मिटवा

उजळा ग्रामोन्नतीचा दिवा श्र तुकड्या म्हणे

चिंचोली येथे अनेक वर्ष ते तंटामुक्त समितीचे अध्यक्ष होते. गावातील तंटे गावातच मिटावे आणि सामाजिक समरसता नांदावी याकरता ते नेहमी आग्रही असे. त्यामुळेच गावातील सण -उत्सवामध्ये पहिला मान हा त्यांचा असायचा. गंगाधरराव असल्याशिवाय पोळ्यामध्ये कुणीही गुढी धरत नसे. एवढेच काय तर गुढीपाडव्याला नवीन गडी -माणसे ठेवताना आणि लग्नकार्य ठरविताना गावातील मंडळी त्यांच्याशी सल्लामसलत करूनच पुढचा निर्णय घेत असे. ही सर्व त्यांच्या पुरोगामीत्वाची आणि वैचारिक प्रगल्भतेची साक्ष देतात.

मागील वर्षी त्यांचे पुत्र -पौत्र आणि आप्तेष्टांनी त्यांचा अमृत महोत्सव साजरा केला. आपला अमृत महोत्सव आपल्या डोळ्यादेखत साजरा होतोय या विचाराने ते हुरळून गेले होते. मृत्यू पश्चात कुळाचार करण्यापेक्षा हयातीत असताना बरसणाऱ्या अमृतधारा बघून ते आनंदले होते. आम्ही त्यांच्यावर एक चित्रफित तयार केली होती . त्यामध्ये त्यांचा ओसंडून वाहणारा सहभाग आणि चेहऱ्यावरील समाधानाचे शिंपण आजही मनात दाटीवाटी करतात. कार्यक्रमाला आलेल्या प्रत्येकाला ते अभिवादन करीत होते आणि बहरलेले कुटुंब बघून आनंदाश्रू ढाळीत होते. आपल्या डोळ्यादेखत आपल्या कार्यकर्तुत्वाची समाजाने दिलेली पावती बघून त्यांचे डोळे दिपून गेले. त्या सोहळ्याच्या आठवणी आजही कुटुंबीयांच्या मनात रुंजी घालतात.

प्रामाणिकता, वात्सल्य, सहकार्य आणि माणसांचा गोतावळा ही गंगाधररावांची बलस्थाने होती. त्यामुळेच ते राजकारणासह समाजकार्यात अग्रस्थानी राहत असे.... त्यामुळेच त्यांच्या शब्दाला मानही होता.....त्यामुळेच दातृत्व त्यांच्या विचारात झिरपले.....! ऊन- सावली, फायदा -तोटा, पिकी -नापिकी हे जीवनाचे अंग आहे हे चिंतन उराशी बाळगून त्यांनी आयुष्यभर शेती केली. या वर्षी शेती तोट्यात गेली, नापिकी झाली असे निराशेचे किनार असलेले शब्द आम्ही त्यांच्या तोंडी कधीही बघितले नाही. संकटांशी दोन हात करत सकारात्मकतेने पुढे कसे जायचे याचा वस्तुपाठ म्हणजे आमचे बाबा होते.

मधुमेहाने ग्रासल्यानंतर काही आजारांनी त्यांच्या शरीराला छळणे सुरू केले. मात्र त्याही परिस्थितीत मोबाईल फोनवरून अचूक सूचना गडी- माणसांना देऊन त्यांनी शेती सांभाळली. शेवटपर्यंत भरघोस उत्पन्न घेणारे प्रगतिशील शेतकरी असाच त्यांचा लौकिक होता. कारण शेतीकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन हा व्यावसायिक होता. जगण्यातला साधेपणा पण विचारांचा मोठेपणा याचे विलोभनीय दर्शन त्यांनी घडविले. आज त्यांच्या जाण्याला तेरा दिवस पूर्ण झाले तरीही त्यांची चिरंतन संजीवक स्मृती कायम घरात दरवळते आहे. त्यांच्या जाण्याने एक मार्गदर्शक आणि हक्काने काही सांगावे असा आश्वासक श्वास कायमचा विरून गेला. पण त्यांचे जगणे हे सार्थकी होते याची अनुभूती वारंवार येत राहील. कसे जगावे याचे उत्तर त्यांच्या जगण्यात सापडते हे मात्र नक्की......!

**झाडांवरूनी गळून पडल्या
पाचोळ्यासम काय जगावे,
अर्पून जावे देवपूजेस्तव
निर्माल्यातून फक्त उरावे!
असे जगावे...... असे जगावे.....**

**-डॉ. प्रशांत खुळे,वरोरा**

## आत्मविश्वास आणि इच्छाशक्तीच्या बळावर यश मिळवणे सोपे-संजय थुल

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जीवनात कोणतीही गोष्ट शक्य आहे, फक्त मेहनत, आत्मविश्वास आणि इच्छाशक्तीची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन संजय थुल (खठड, असिस्टंट कमिश्नर, नागपूर) यांनी केले.प्रबोधन विचार मंच आणि युवा मंच यांच्या वतीने ज्ञान आणि धन कमवा, वाचवा आणि वाढवा या विषयावर १६ मार्च २०२५ रोजी चंद्रपूर येथील एन. डी. हॉटेलमध्ये प्रबोधन सम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी संजय थुल बोलत होते. पुढे बोलताना संजय थुल म्हणाले, सामाजिक परिवर्तन करणाऱ्या चळवळींशी जोडल्यास व्यक्तिमत्त्वाचा विकास लवकर होतो.कार्यक्रमाला प्रमुख अतिथी संध्या चिवंडे (अधीक्षक




अभियंता, महावितरण, चंद्रपूर) आणि प्रीती वेल्हेकर (विस्तार अधिकारी, राजुरा) उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक डॉ. अशफाक अहमद खान (मुंबई) यांनी आत्मविश्वास, सृजनशीलता आणि चारित्र्य या त्रिसूत्रीवर मार्गदर्शन करताना सांगितले की, स्वतःवर विश्वास ठेवल्यास कुणाशीही व्यवहार करताना मनात भीती निर्माण होणार नाही. आत्मविश्वासासोबत चारित्र्य उत्तम असेल, तर यशस्वी होण्यास वेळ लागणार नाही. ते पुढे म्हणाले, माणसाने नवनवीन गोष्टी शिकण्यासाठी सृजनशील असले पाहिजे. नाविन्यपूर्ण कार्य कसे करता येईल, यावर विचार केला पाहिजे. कार्यक्रमाचे अध्यक्ष विनोद आर. सोनटक्के यांनी मानसिक गुलामी ओळखून, तिच्याविरोधात बंड करण्याची मानसिकता निर्माण करण्यासाठी हा प्रबोधन सम्मेलन आयोजित करण्यात आला, असे स्पष्ट केले.त्यांनी सामाजिक चळवळीत सहकुटुंब सहभागी होण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाचे संचालन ईशा रामटेके यांनी केले. प्रस्ताविक प्रिया माहूरकर, स्वागतगीत नंदा जीवने, मनोगत रुपाली चालखुरे आणि विध्येय सोनटक्के, तर आभार प्रदर्शन ताहा शेख यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रिया माहूरकर, रुपाली चालखुरे, नंदा जीवने, कविता पाटील, मोहिनी खोब्रागडे, सुनिता शेंडे, ईशा रामटेके, केमा निकोडे, इशिका दुधे, मानसी शेंडे, ओजस्वी चिवंडे, ईशा उमरे, सोनाली सोनटक्के, प्रेरणा चिवंडे, मनश्री खोब्रागडे, अनुजा येरने, गौरी निकुरे, प्राची नगराळे, मनस्वी चालखुरे यांनी परिश्रम घेतले.

## विना परवाना बंदूक बाळगल्याप्रकरणी अक्षय सुतारला अटक; पोलिसांची कारवाई

**सातारा । प्रतिनिधी**

जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी शाहूपुरी पोलिसांनी मोठी कारवाई करत विना परवाना बंदूक आणि जिवंत काडतूस बाळगणाऱ्या अक्षय यशवंत सुतार (वय २६, रा. मोरे कॉलनी, सातारा) यास अटक केली आहे.

शाहूपुरी पोलिस ठाण्यात २० मार्च रोजी बेकायदेशीर शस्त्र बाळगण्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक समीर शेख, अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैशाली कडुकर आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले यांनी तपासाचे आदेश दिले. त्या अनुषंगाने शाहूपुरी पोलीस निरीक्षक सचिन म्हेत्रे यांनी गुन्ह्याच्या तपासासाठी विशेष पथक नियुक्त केले.शाहूपुरी गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी तपास सुरू केला असता अक्षय सुतार हा मोरे कॉलनी परिसरात फिरत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तात्काळ कारवाई करत त्याला ताब्यात घेतले आणि चौकशीदरम्यान त्याच्याकडून ७५,००० रुपये किमतीची पिस्तूल, ५०० रुपये किमतीचे एक जिवंत काडतूस आणि १२,००० रुपये रोख रक्कम असा एकूण ८७,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

ही कारवाई शाहूपुरी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस अधिकारी कुमार ढेरे, अंमलदार सुरेश घोडके, मनोज मदने, निलेश काटकर, ज्योतीराम पवार, महेश बनकर, अभय साबळे, सचिन पवार, स्वप्निल सावंत, स्वप्निल पवार, सुमित मोरे, संग्राम फडतरे तसेच सायबर शाखेचे अंमलदार महेश पवार आणि प्रशांत मोरे यांनी केली.गेल्या काही दिवसांत सातारा जिल्ह्यात बंदूक आणि जिवंत काडतुसे बाळगणाऱ्या आरोपींच्या संख्येत वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे पोलीस विभागाकडून सतत मोहिमा राबवून अशा गुन्हेगारांवर कारवाई केली जात आहे. या प्रकरणाचा पुढील तपास शाहूपुरी पोलीस करत आहेत.

## जागतिक जलदिनी बदलापूर मध्ये पाण्यासाठी आंदोलन मनसेचा उपोषणाचा इशारा

**बदलापूर । प्रतिनिधी**

वाढत्या उन्हामुळे राज्यातील पाणीसाठ्यात झपाट्याने घट होत असून, ग्रामीण तसेच शहरी भागात पाण्याच्या तीव्र संकटाचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. बदलापूर पूर्वेकडील पनवेल हायवे परिसरातील भवानी हाइट्स आणि युनिक हाइट्स संकुलातील रहिवासी दीड वर्षांपासून भयानक पाणीटंचाईला तोंड देत आहेत. शनिवारी जागतिक जलदिनाच्या दिवशी संतप्त महिलांनी संकुलाच्या आवारात रिकामी भांडी आणून आंदोलन केले. टँकरच्या अशुद्ध पाण्यामुळे रहिवाशांना वेगवेगळ्या आजारांना सामोरे जावे लागत आहे. तसेच विकासकाकडून दिल्या जाणाऱ्या टँकरच्या पाण्याचा टेस्टिंग रिपोर्ट मागूनही मिळत नसल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे.रहिवाशांनी स्पष्ट शब्दांत संताप व्यक्त करत गेल्या दीड वर्षांपासून आम्ही आमच्या हक्काच्या पाण्यापासून वंचित आहोत. आम्हाला एमआयडीसीचे शुद्ध आणि स्वच्छ पाणी मिळाले पाहिजे. जर प्रशासन आमच्या समस्या सोडवणार नसेल, तर पुढील निवडणुकीत मत मागण्यासाठी कोणीही आमच्याकडे फिरकू नये,असा इशारा दिला.या पाणीटंचाईवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला शहराध्यक्ष संगीता चेंदवणकर यांनी प्रशासनावर जोरदार हल्लाबोल करत, बदलापूरमध्ये



आधीच अपुरा पाणीपुरवठा होत असताना नवीन टोलेजंग इमारतींना परवानगी का दिली जाते? जर हा प्रश्न लवकर सुटला नाही, तर आम्ही उपोषणाला बसणार. माझा जीव गेला तरी चालेल, पण बदलापूरकरांना हक्काचे पाणी मिळवून देण्यासाठी मी लढा देईन, असा इशारा दिला आहे.आज जागतिक जलदिन असूनही आम्हाला दुष्काळ दिन साजरा करावा लागत आहे. बिल्डरने आम्हाला अक्षरशः पाण्यासाठी फसवले आहे. आम्हाला आता टँकरच्या अशुद्ध पाण्यावर राहायचे नाही, आम्हाला एमआयडीसीचे पाणी त्वरित द्यावे! असा आक्रोश महिलांनी व्यक्त केला.बदलापूर शहरात वाढत्या पाणीटंचाईमुळे प्रशासनाच्या नियोजनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एका बाजूला शहर विस्तारत असताना पाणीपुरवठ्याची अपुरी व्यवस्था भविष्यात आणखी गंभीर स्वरूप धारण करणार असल्याची भीती व्यक्त होत आहे.

## गडचांदूर येथे भव्य महाआरोग्य शिबीर; १५९० रुग्णांची मोफत तपासणी, ३९२ शस्त्रक्रियेस पात्र





**गडचांदूर । प्रतिनिधी**

राजुरा विधानसभा क्षेत्राचे आमदार देवराव भोंगळे यांच्या संकल्पनेतून आणि सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्र तसेच भारतीय जनता पक्ष, गडचांदूर यांच्या वतीने स्व. भाऊराव पाटील चटप आश्रमशाळेत भव्य महाआरोग्य शिबीर संपन्न झाले. या शिबिराचा गडचांदूर आणि परिसरातील १५९० नागरिकांनी लाभ घेतला, तर ३९२ रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी निवडण्यात आले.

शिबिरात नेत्ररोग, सर्जरी, बालरोग, स्त्रीरोग, दंतरोग, कान-नाक-घसा, अस्थिरोग, त्वचारोग, मेडिसिन आणि कॅन्सर तज्ज्ञांनी रुग्णांची तपासणी केली. या तपासणीत ३९२ रुग्ण विविध शस्त्रक्रियेस पात्र ठरले असून, त्यांच्यावर आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी (मेघे) येथे टप्प्याटप्प्याने उपचार करण्यात येणार आहेत.या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी आमदार देवराव भोंगळे म्हणाले, लोकनेते आ. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी सेवेचा मंत्र दिला आहे. त्यांच्या प्रेरणेतूनच आम्ही सेवा केंद्राच्या माध्यमातून असे महाआरोग्य शिबिर आयोजित करत आलो आहोत.ते पुढे म्हणाले, आरोग्य ही सर्वात मोठी संपत्ती आहे. मात्र, धकाधकीच्या जीवनात अनेकजण स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे वेळीच निदान होणे गरजेचे आहे. या शिबिराच्या माध्यमातून गोरगरीब जनतेसाठी आरोग्य तपासणी आणि उपचाराची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. भविष्यातही अशा शिबिरांचे आयोजन करून अधिकाधिक नागरिकांना लाभ मिळवून देण्याचा आमचा मानस आहे.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी भाजपचे जिल्हा महामंत्री विवेक बोढे, तालुकाध्यक्ष संजय मुसळे, तालुका महामंत्री सतिश उपलेंचवार, शहराध्यक्ष अरूण डोहे, भाजपा अनुसूचित जमाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अरूण मडावी तसेच डॉ. हरीश घोरे, शंकर आपुरकर, प्रमोद कोडापे, महेश घरोटे, अरविंद एकरे, शिवाजीराव सेलोकर आणि शहराध्यक्षा शितल धोटे, अपर्णा उपलेंचवार, उमा कंठाळे, नमिता विश्वास, रंजना मडावी यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोलाचे योगदान दिले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .